# लघुलेखक-लघुटंकलेखक परीक्षा (मराठी ) -२००७

**परीक्षेचा दिनांक :-** १९ ऑगस्ट,२००७

**मराठी भाषा व बुध्दिमापन चाचणी**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक १९ ऑगस्ट,२००७** रोजी घेण्यात आलेल्या **लघुलेखक व लघुटंकलेखक (मराठी ) परीक्षा - २००७** च्या **मराठी भाषा व बुद्धीमापन चाचणी** या विषयाची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरांमध्ये काही दोष आढळल्यास त्यासंबंधी उमेदवाराने अधिप्रमाणित स्पष्टीकरण / संदर्भ देऊन आपले लेखी निवेदन टपालाने पाठवावे. यासंदर्भात **दिनांक ५ ऑक्टोबर,२००७ पर्यंत** आयोगाकडे पोहोचलेल्या लेखी निवेदनांचीच दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

---

**1. 'शुध्दलेखन ' कशास म्हणावे?**
**उत्तर: - व्याकरणातील नियमांना अनुसरुन केलेले निर्दोष लेखन**

---

**2. थोरांचे विचार_______ आणायचे असतात**
**उत्तर : आचरणात**

---

**3. खाली दिलेल्या शब्दापैकी शुध्द शब्द कोणता ?**
**उत्तर :- मुद्रांकित**

---

**4. खालील शब्दाचा योग्य अर्थ निवडा-**
**विधान -गुडघे टेकणे**
**उत्तर :- शरण येणे**

---

**5. पुढे दिलेल्या शब्दाशी समानार्थी नसलेला शब्द निवडा -" जागा ".**
**उत्तर :- निवांत**

---

**6. कळीचा जन्मसिध्द हक्क कोणता ?**
**उत्तर :- फुलण्याचा**

---

**7. कळीच्या मनात पक्का निर्धार कोणता असतो ?**
**उत्तर :- वरील सर्व**

---

**8. कवितेतील कळीसाठी कोण तिष्ठत असतो ?**
**उत्तर :- सुर्याचा किरण**

---

**9. ' जन्म झाल्यापासून प्राप्त झालेला हक्क'**
**या शब्दसमूहासाठी कवितेत कोणता शब्द आलेला आहे?**
**उत्तर :- जन्मसिद्ध**

---

**10. कवितेतील ' कळी' हे कशाचे प्रतिक आहे?**
**उत्तर :- नव्याने जन्म घेणा-याचे**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

11. 'वतनवारसा आकाशावर कोरण्याचा'
या ओळींचा नेमका अर्थ काय ?

उत्तर :- परंपरेने प्राप्त झालेले वैभव वाढविणे

---

12. ' कपाळ फुटणे' म्हणजे काय ?

उत्तर :- दुर्दैव ओढवणे

---

13. खाली दिलेल्या शब्दांपैकी कोणता शब्द 25 वर्षे पूर्ण झाल्यावर साजरा करावयाच्या उत्सवासाठी वापरतात?

उत्तर :- रौप्य महोत्सव

---

14. योग्य शब्द भरा.
विधान-संकोच न करणारा कोण ?____________

उत्तर :- निर्भीड

---

15. योग्य शब्द भरा _
विधान -गणेशरावांच्या घरी आज लक्ष्मी पाण्ी भरते आहे,पण पूर्वी त्यांच्या घरी ______विश्वे दारिद्रय होते

उत्तर :- अठरा

---

16. योग्य शब्द भरा.
एकूलता एक मुलगा_____________

उत्तर :- वंशाचा दिवा

---

17. ' अभिवृध्दी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?

उत्तर :- नाश

---

18. राम नसणे म्हणजे?

उत्तर :- अर्थ नाही

---

19. ' मृत्युंजय ' म्हणजे काय?

उत्तर :- मृत्युवर विजय मिळविणारा

---

20. 'ठणठणपाळ' म्हणजे ?

उत्तर :- मूर्ख

---

21. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द ओळखा.

उत्तर :- ऊस

---

22. मामाला पत्र लिहिताना कोणता मायना लिहाल?

उत्तर :- तीर्थस्वरुप

---

23. विनोद निर्माण करण्यासाठी कोणत्या बुध्दीची आवश्यकता आहे ?

उत्तर :- विनोद बुध्दी

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

24. 'विनोद हे दुधारी शस्त्र आहे ' असे कोणी् म्हटले?

उत्तर :- श्री.कृ.कोल्हटकर

---

25. दुधारी शस्त्र चालविणा-याची भूमिका कशी असावी?

उत्तर :- कुशाल व सहदय

---

26. विनोदकाराला व्यक्ती व समाज कसा करावयाचा असतो?

उत्तर :- सुंदर व सुसंस्कृत

---

27. विनोदकाराला शरीराचा नेमका कोणता भाग कापून काढावयाचा असतो?

उत्तर :- दोषपूर्ण व दुखणारा

---

28. दोषनिराकरण्यासाठी दोषकाराने कशा पद्वतीने तयार होणे महत्वाचे आहे?

उत्तर :- स्वयंस्फूर्तीने

---

29. 'लेखकाने कादंबरी लिहून काढली' या वाक्यातील प्रयोग ओळखा -

उत्तर :- समापन कर्मणी प्रयोग

---

30. रिकाम्या जागी योग्य शब्द निवडा.

वाक्याचा अर्थ पूर्ण करणा-या शब्दाला ________म्हणतात.

उत्तर :- क्रियापद

---

31. ' या कानाचं त्या कानास कळणार नाही ' म्हणजे ______

उत्तर :- दुस-याला सांगणार नाही.

---

32. ' पुस्तक ' हा शब्द मराठीत कोणत्या लिंगात वापरतात ?

उत्तर- नपुंसकलिंग

---

33. ' नर्तिका ' हया नामाचे विरुध्द लिंगी रुप ओळखा.

उत्तर :- नर्तक

---

34. खाली दिलेल्या वाक्यात गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.

वाक्य-आपले विचार आणि भावना व्यक्त करण्याचा साधा,सोपा मार्ग म्हणजे_________?

उत्तर :- पत्रलेखन

---

35. माझ्याहून श्रेष्ठ माणसे जगात आहेत.

अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.

उत्तर :- पंचमी

---

36. विधानार्थी करा-

काय तो मोरु आहे !

उत्तर :- तो मोरुच असला पाहिजे

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

37. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी सामासिक शब्द वापरुन वाकय रुपांतर करा
आमच्या महाविद्यालयाचे मुखपत्र असलेला अंक वर्षातून एकदा निघतो.

उत्तर :- आमच्या महाविद्यालयाचे ते वार्षिक असते

---

38. ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने प्रथम एकत्र येऊन शेवटी एक स्वर मिसळतो त्यास काय म्हणतात ?

उत्तर :- जोडाक्षर

---

39. वाक्यप्रकार ओळखा -
' पावसाळयात सगळीच झाडे हिरवी होतात.'

उत्तर :- केवल

---

40. 'आंबटचिंबट' हा ________शब्द होय.

उत्तर :- अंशाभ्यस्त

---

41. " सचिन तेंडुलकर चांगला खेळाडू आहे." " त्याने एकशे आठ धावा काढल्या " या दोन वाकयांचे संयूक्त वाक्य तयार करा.

उत्तर :- एकशे आठ धावा काढणारा सचिन तेंडूलकर चांगला खेळाडू आहे.

---

42. पुढील वाक्य अर्थ न बदलता नकारार्थी करा.
" गर्दीत म्हातारा किती वेळ थांबेल ?"

उत्तर :- गर्दीत म्हातारा जास्त वेळ थांबू शकणार नाही.

---

43. ' आत', ' बाहेर', 'मागे', ' पुढे', ' मध्ये', 'अलिकडे ', 'समोर', ही शब्दयोगी अव्यये खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहेत?

उत्तर :- स्थलवाचक शब्दयोगी अव्यये

---

44. आपला देश साखर अभ्रक ट्रैक्टर कापड नि चहा निर्यात करतो.
_______यात किती स्वल्पविराम वापराल?

उत्तर :- तीन

---

45. खेडयातील तरुणाला शहरात ओळखतो कोण ?
या वाक्याचे ' केवल वाक्य ' बनवा.

उत्तर : खेडयातील तरुणाला शहरात कोणी ओळखत नाही.

---

46. खाली दिलेल्या पर्यायातील अनन्वय अलंकाराचे उदाहरण ओळखा.

उत्तर :- झाले बहू,होतिल बहू,आहेतहि बहू,परंतु या सम हा

---

47. संत महंतांनी कोणता प्रयत्न केला ?

उत्तर :- जात नष्ट करण्याचा

---

48. संतांचे आचार-विचार कशाचे द्योतक आहे

उत्तर : समतेचे

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

49. देवत्त्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कोणाला नाही ?

उत्तर :- ज्याच्या मनात समताही नाही व ममताही नाही.

---

50. सर्वसामान्यांची जात कोणती असावी असे संतांना वाटते?

उत्तर :- जात माणूसच असावी

---

51. संतांचे कोणते स्वप्न होते?

उत्तर :-माणसांची जात वाढावी

---

52. ' स्वत:शीच केलेले संभाषण'

शब्दसमूहासाठी एक शब्द सांगा.

उत्तर :- स्वगत

---

53. 'द्विगू' समास ओळखा.

उत्तर :- पंचपाळें

---

54. जे शब्द नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात व वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवितात त्यांना ____ म्हणतात.

उत्तर:- शब्दयोगी

---

55. योग्य शब्द भरा.

विधान - दुष्काळाच्या दिवसात काही व्यापारी आपले __________ अगदी पांढरे करुन घेतात.

उत्तर :- उखळ

---

56. 'अव्ययीभावं' समासाचे उदाहरण सांगा.

उत्तर :- आमरण

---

57. 'बा नीज गडे नीज गडे लडीवाळा

नीज नीज माझ्या बाळा' या काव्यपंक्तीत कोणता रस आहे ?

उत्तर :- वात्सल्य

---

58. लहान मुल म्हणजे मातीचा गोळा

आकार द्यावा तशी मूर्ती घडते.

- अधारेखित शब्दांचा अलंकार सांगा.

उत्तर :- रुपक

---

59. महापूरे झाडे जाती तेथे लव्हाळी राहती.

_______ अधोरेखित शब्दांचा अर्थ काय ?

उत्तर :- नम्रपणा

---

60. ' गतिमानता हा जगाचा नियम आहे तसंच बदलत जाण हा माणसाचा धर्म आहे' या विधानातील वाक्य प्रकार ओळखा.

उत्तर :- मिश्र वाक्य

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

61. खालीलपैकी कोणता शब्द सामान्य नाम आहे ?

उत्तर :- मुलगा

---

62. 'अत्तर' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे?

उत्तर :- फारसी

---

63. ' त्याला बासरी वाजवता येत नाही' वाक्यप्रकार ओळखा.

उत्तर :- नकारार्थी

---

64. ' मी त्याच्याकडून चार आणे परत घेतो ' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

उत्तर : कर्तरी

---

65. पुढे दिलेल्या शब्दातून शुध्द शब्दाचे रुप लिहा.

उत्तर :- साहित्यिक

---

66. हिंदुस्थानातील 80 टक्के लोक कशावर उदरनिर्वाह करतात ?

उत्तर :- शेतीवर

---

67. लोकांना मजूरीस कोठे जावे लागत आहे?

उत्तर :- मोठया शहरात

---

68. देशाच्या कल्याणासाठी काय केले पाहिजे

उत्तर :- शेतीत सुधारणा केली पाहिजे

---

69. शेतक-याचे हित साधणारी गोष्ट कोणती?

उत्तर :- नांगर आणि मोट यात सुधारणा करणे

---

70. शहरातील आरोग्य कशामूळे बिघडते ?

उत्तर :- माणसांच्या गर्दीमूळे

---

71. ' क्रीडांगण' हा शब्द कोणत्या समासाचे उदाहरण आहे?

उत्तर :- चतुर्थी तत्पुरुष

---

72. सकर्मक क्रियापदाचे वाक्य कोणते ?

उत्तर :- त्याने कागद फाडला

---

73. पुढे दिलेल्या शब्दाशी समानार्थी नसलेला शब्द निवडा.?
शब्द ----" चांदणे "

उत्तर :- इंदू

---

74. पुढीलपैकी 'तदभव' 'शब्द नाही :

उत्तर :- हाड

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

75. ' माळ' या शब्दाचे अनेक वचन कोणते ?
उत्तर :- माळा

---

76. क्रियापद म्हणजे___________
उत्तर :- वाक्यातील क्रिया दाखवून वाक्याचा अर्थ पूर्ण करते

---

77. धातूचे प्रकार कोणते?
उत्तर :- वरील सर्व

---

78. 'अभि + उदय' हा कोणत्या संधीयुक्त शब्दाचा विग्रह आहे?
उत्तर :- अभ्युदय

---

79. चिमण्यांचा _______ असतो.
उत्तर :- थवा

---

80. 'द्वंद समास' ओळखा .
उत्तर :- पास नापास

---

81. ' हिमालय हा सर्वात उंच पर्वत आहे ' या वाक्यातील 'हिमालय'हे_________आहे.
उत्तर :- विशेष नाम

---

82. नामाचे कार्य करणा-या गौणवाक्याला ________ म्हणतात.
उत्तर : नामवाक्य

---

83. जेव्हा क्रियापदाच्या रुपावरुन कर्तव्य,शक्यता,रीत,योग्यता या अर्थाचा बोध होतो तेव्हा त्यास ______ म्हणतात.
उत्तर :- विध्यर्थ

---

84. खालीलपैकी संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यय कोणते ?
उत्तर :- अरे

---

85. वाक्यातील क्रियापदाच्या रुपावरुन नुसताच काळाचा बोध होत असेल तर त्यास ______वाक्य म्हणतात
उत्तर :- स्वार्थी

---

86. 'चतूर्भुज होणे ' म्हणजे काय ?
उत्तर :- लग्न करणे

---

87. 'मी', 'आम्ही', 'आपण','स्वत:', ही कोणती सर्वनामे आहेत?
उत्तर: पुरूषवाचक सर्वनाम

---

88. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी सामासिक शब्द वापरुन वाक्य रुपांतर करा:
विधान - 'ललित' हे आठवडयातून निघणारे नियतकालिक आहे.
उत्तर :- 'ललित' हे साप्ताहिक नियतकालिक आहे

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

89. ' बाबु गेनू हा <u>देशासाठी प्राण अर्पण करणारा ठरला'</u>
( अधोरेखित शब्दांबद्यल एक शब्द ओळखा )

उत्तर :- हुतात्मा ठरला

---

90. ' आजींच्या डोळयात चटकन पाणी आले.' या वाक्यातील 'चटकन' हे ______अव्यय आहे

उत्तर :- क्रियाविशेषण

---

91. 'इतीश्री' या शब्दाचा अर्थ ओळखाः

उत्तर :- शेवट

---

92. बोलणा-याच्या तोंडचे शब्द सूचित करण्यासाठी कोणत्या चिन्हांचा वापर करतात ?

उत्तर :- दुहेरी अवतरण (" ")

---

93. पंधरा दिवसातून एकदा भरणारी बैठकः

उत्तर :- पाक्षिक

---

94. "श्रीमंत माणसांना गर्व असतो" या विधानातील विशेषणाचा प्रकार ओळखाः

उत्तर : नामसदृश विशेषण

---

95. व्यंजन कोणते ते सांगा :

उत्तर :- क्ष्

---

96. ' अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली ' या विधानातील 'मशाली ' या शब्दाचे वचन कोणते?

उत्तर :- अनेक वचन

---

97. ' फुलाने ,फुलाशी ' हया शब्दांमध्ये कोणती विभक्ती आहे?

उत्तर :- तृतीया

---

98. सकर्मक भावे प्रयोगाचे उदाहरण ओळखा.

उत्तर :- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.

---

99. ज्या वाक्यात ' भावनेचा उदगार' असतो त्याला कोणत्या प्रकारचे वाक्य संबोधावे?

उत्तर :- उदगारार्थी वाक्य

---

100. पुढीलपैकी समुदायवाचक नाम नाही.

उत्तर :- भारत

---

101. खालील शब्दांमध्ये कोणते अक्षर सर्वात जास्त वेळा आले आहे?
कळस, गरम, सरळ, कमळ, मलम

उत्तर :- म

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**102.** दिलेल्या शब्दांशी संबंधित नसलेला शब्द ओळखा:

उत्तर :- रत्नाकर

---

**103.** रिकाम्या जागी योग्य पर्याय द्या.

वडिलांशी तुलना करता मुलगा हा नेहमीच _______ असणार.

उत्तर :- वयाने लहान

---

**104.** डोळे : बुबुळ तर तोंड : ?

उत्तर :- जीभ

---

**105.** जर was,built, a, Taj Mahal,in not,day हे शब्द घेऊन अर्थपूर्ण वाक्य बनविल्यास "in" नंतर कोणता शब्द येईल ?

उत्तर : a

---

**106.** या प्रश्नात पाच शब्द दिले आहेत.योग्य तो निकष वापरुन या संज्ञांचा क्रम लावल्यास मध्यभागी कोणते पद येईल ते ओळखा.

बी पुरणे, रोपटे, अंकुर फुटणे, पाणी घालणे, फूल.

उत्तर :- अंकुर फुटणे

---

**107.** प्रश्नांच्या सुरवातीला एक शब्द दिला आहे त्या शब्दाला विरुद्धार्थी शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा

सुरेल :

उत्तर :- बेसूर

---

**108.** खालील पर्यायापैकी अयोग्य शब्द निवडून बाहेर काढा.

शुन्याकार, गोलाकार, निराकार, वर्तुळाकार.

उत्तर :- निराकार

---

**109.** डेसिग्रॅमला जसे सेंटीग्रॅम तसे डेकाग्रॅमला काय?

उत्तर :- ग्रॅम

---

**110.** a,b,c या संख्यांची सरासरी किती ? खालील पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.

उत्तर:- $\frac{a+b+c}{3}$

---

**111.** खाली काही संख्या दिल्या आहेत.त्यापैकी एक वेगळी आहे ती संख्या शोधा.

495, 253, 330, 582, 143, 671

उत्तर :- 582

---

**112.** एका परीक्षेत बरोबर उत्तराला 7 गुण मिळतात आणि उत्तर चुकल्यास 3 गुण कमी होतात.रामने 25 प्रश्न सोडविले तेंव्हा त्याला 115 गुण मिळाले तर त्याची किती उत्तरे बरोबर आली?

उत्तर :- 19

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**113. 7 ला 56 तसे 11 ला काय?**

**उत्तर :- 132**

---

**114. खालील संख्यामालिकेत दिलेले अंक काही नियमांनी तयार आलेले आहेत.तो नियम ओळखून प्रश्नचिन्हा च्या जागी असणारा अंक ओळखा.**

**3, 21 ,7, 42, 6, ? 9, 36, 4.**

**उत्तर :- 54**

---

**115. विसंगत अंक ओळखा.**

**18,21, 24, 28**

**उत्तर :- 28**

---

**116. जर 3 ☐ 8 = 17**

**5 ☐ 9 = 38**

**7 ☐ 10 = -?**

**उत्तर :- 59**

---

**117. पुढे दिलेल्या अंकक्रमिकेत ? च्या जागी कोणती संख्या येईल?**

**7, 13 ,17, 23 ,27, ?, 37,43**

**उत्तर :- 33**

---

**118. प्रश्नचिन्हांच्या जागी कोणती संख्या येईल ?**

**27, 125,343, 729, ?**

**उत्तर : 1331**

---

**119. खालील उदाहरणातील योग्य पर्याय निवडा.**

**12.5 x 0.1 ÷ 1.25 = ?**

**उत्तर :- 1**

---

**120. F,I, L,O,___? नंतर कोणते अक्षर येईल?**

**उत्तर:- R**

---

**121. सहसंबंध ओळखा.**

**जर C11K : E 17Q**

**तर D15O : ?**

**उत्तर :- F21U**

---

**122. PLATO हा शब्द 35204 साठी वापरला जातो तर 2043 साठी खालीलपैकी कोणते पद असेल?**

**उत्तर : ATOP.**

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**123.** खालीलपैकी वेगळा गट कोणता ?

**ACBD, EGFH, ILJK, MONP, QSRT**

उत्तर :- **ILJK**

---

**124.** खाली अक्षरांची मालिका आहे.त्यातून एका प्रकार वगळला आहे.त्याजागी xलिहिले आहे.तो शोधा:

**BDZXU, CEYYT, X, EGWAR, FHVBQ, GIUCP**

उत्तर :- **DFXZS**

---

**125.** जर **WROST = TSROW**

**STYLE = ELYTS**

तर **STATE= ?**

उत्तर :- **ETATS**

---

**126.** विजोड घटक ओळखा :

**C3, F6, I9, L13**

उत्तर :- **L13**

---

**127.** माझ्या आईने एका बाळास जन्म दिला.पण ते बाळ त्याचा भाऊ नाही व बहिण नाही, मग ते कोण.

उत्तर : स्वत:

---

**128.** राधा व रमा या बहिणी आहेत.सरला व विमल याही बहिणी आहेत.सरलाचे वडील रमाचे भाऊ होत.तर विमल ही राधाची कोण ?

उत्तर: भाची

---

**129.** मोनिका हिचा एका रांगेत उजवीकडून 13 वा आणि डाविकडून 5 वा क्रमांक आहे. राधिका हिचा याच रांगेत उजवीकडून 17 वा क्रमांक आहे. तर राधिका आणि मोनिका यांच्या दरम्यान किती मुली असतील ?

उत्तर :- **11**

---

**130.** तुझ्याकडे शेतावर किती गुरे आहेत ? असे संपतला विचारल्यावर त्याने गमतीने उत्तर दिले " माझ्या शेतावर काम करणा-या माणसांचे व गुरांचे पाय यांची बेरीज 76 होते आणि गुरांची व माणसांची डोकी यांची बेरीज 22 होते तर संपतकडे गुरांची संख्या किती

उत्तर :- **16**

---

**131.** जर एखाद्या नकाशात पूर्व दिशा "नैऋत्य ' दिशेच्या स्थानी आली.तर त्या नकाशात 'आग्नेय' दिशा कोणत्या दिशेच्या स्थानी येईल ?

उत्तर :- पश्चिम

---


**132.** 'महाभारतकथामृत' या शब्दात अकारान्त अक्षरे किती?

उत्तर :- **5**

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial


133. खालील आकृत्यांमध्ये काही संख्या दिल्या आहेत त्यांचा अभ्यास करुन प्रश्नचिन्हाच्या जागी असणारी संख्या ओळखा?




उत्तर :- 100

---


134. खालील आकृतीत त्रिकोण किती?



उत्तर :- 12

---

135. प्रत्येक चौकटीतील आकृत्या विशिष्ट क्रमाने फिरत आहेत तो क्रम ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.




उत्तर 2

---

136. खालील अंकाकरिता काही चिन्हे वापरली आहेत.

| अंक – | 0 | 1 | 3 | 5 | 7 | 9 | 11 | 13 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चिन्हे – | △ | □ | ⬠ | ○ | + | ✳ | ▽ | × |

34 बेरीज येण्यासाठी खालील बरोबर उत्तर कोणते ?

उत्तर :- + ⬠ △ ▽ ×

---

137. खालील चौरसात प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?

| | | |
|---|---|---|
| 1 | 9 | 25 |
| 49 | 81 | ? |
| 169 | 225 | 289 |

उत्तर :- 121

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**138.** **1988 या वर्षी प्रजासत्ताक दिन मंगळवारी होता तर 1990 या वर्षी स्वातंत्र्य दिन कोणत्या वारी येईल ?**
**उत्तर :- बुधवार**

---

**139. INTRODUCTION या शब्दातील अक्षरे घेऊन बनवलेले अर्थपूर्ण शब्द खाली दिले आहेत त्यापैकी कोणत्या शब्दातील एक किंवा अधिक अक्षरे वर दिलेल्या शब्दातील नाहीत ?**
**उत्तर INTENT**

---

**140.** **खालील मालिकेत काही अक्षरे गाळलेली आहेत.दिलेल्या पर्यायामधून अक्षराचा अचूक गट ओळखा**
**a___b b a a___b a a__b a__b b**
**उत्तर :- a b b a**

---

**141.** **BC=YX तर**
**DE=?**
**उत्तर :- सदर प्रश्न रद्द करण्यात आला आहे.**

---

**142.** **55 आंबे प्रत्येक पेटीत टाकावयाचे आहे.तर 5555 आंबे किती पेटयांमध्ये येतील ?**
**उत्तर :- 101**

---

**143.** **रिकामी जागा भरा.**
**कमान =गराफ, ? = भशाड**
**उत्तर :- फलाट**

---

**144.** **खालील 5 वाक्यांचा क्रम सुधारुन अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा.**
1. **शिक्षक कविता शिकवीत होते**
2. **वर्गात एकच हंशा पिकला**
3. **नागेश मात्र पेंगत होता**
4. **वर्ग रंगून गेला होता**
5. **शेवटी तो घोरु लागला**

**उत्तर :- 1,4,3,5,2**

---

**145.** **खालील पर्यायातून विजोड घटक वेगळा करा.**
**बोकड, मेंढी, शेळी, करडू**
**उत्तर :- मेंढी**

---

**146.** **रिकामी जागा भरा :**
**पुस्तक म्हटले की,त्यास _______ असणारच.**
**उत्तर :- पाने**

---

**147.** **खालील प्रत्येक संख्येतील अंकांची अदलाबदल करुन येणा-या संख्येतील सर्वात लहान संख्या कोणती?**
**79, 34, 29 , 59, 69**
**उत्तर:- 34**

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**148. मटकी, गहू, ज्वारी, बाजरी, यातील गटात न बसणारा शब्द कोणता ?**

**उत्तर :- मटकी**

---

**149. खालील आकृती अभ्यासून प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा अंक लिहा ?**




**उत्तर :- 39**

---

**150. इंग्रजी वर्णमालेतील उजवीकडून आठवे व डावीकडून सतरावे या दोन अक्षरांच्या बरोबर मध्यभागी असलेले अक्षर कोणते?**

**उत्तर :- R**

---

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial